# मिरा भाईंदर महानगरपालिका

**// इतिवृत्तांत //**

**श्री. राधाबिनोद अ. शर्मा,** आयुक्त तथा निवडणूक अधिकारी, मिरा भाईंदर महानगरपालिका यांचे अध्यक्षतेखाली मंगळवार दि.13/1/2026 रोजी दुपारी 2.00 वा. आयुक्त कार्यालय, सभाकक्ष येथे निवडणूक कामांचा अंतिम आढावा बाबत सर्व खाते प्रमुख/विभाग प्रमुख यांची आढावा बैठक पार पडली.

**बैठकी दरम्यान मा. आयुक्तांनी दिलेल्या सूचना/निर्देश खालील प्रमाणे-**

| अ. क्र. | विषय | अंमलबजावणी करणाऱ्या अधिकाऱ्याचे नाव | मा. आयुक्तांचे निर्देश | कालमर्यादा |
|---|---|---|---|---|
| 1 | 2 | 3 | 4 | 5 |
| 1. | कार्यालयात उपस्थित रहाणेबाबत | श्री.सचिन बांगर, उपायुक्त (मु.) | दि.14 ते दि.16 जाने 26 मतदान ते मतमोजणी कालावधीत कार्यालयात उपस्थित रहाणेबाबत कार्यालयीन आदेश पारित करणे. | दि.13/1/26 |
| 2. | आचारसंहिता अंमलबजावणी करणेबाबत | श्रीम. कविता बोरकर, उपायुक्त (जाहिरात)<br>प्रभाग अधिकारी (सर्व) | आज सायं.5.30 वा. आदर्श आचारसंहिता अंतर्गत उमेदवारांना प्रचार बंदी लागू होईल. त्याअनुषंगाने शहरातील सर्व उमेदवार/ राजकीय पक्षांचे फलक, बोर्ड, बॅनर, झेंडे इ.इ. काढून घ्यावेत. तसेच होर्डिंग्ज आणि जाहिरात फलकदारांस राजकीय जाहिराती काढून घेण्याच्या सुचना द्याव्यात. | दि.13/1/26 |
| 3. | आदर्श आचार संहिते बाबत | सर्व प्रभाग अधिकारी<br>भरारी पथक प्रमुख | आज सायं.5.30 वा. आदर्श आचारसंहिता अंतर्गत उमेदवारांना प्रचार बंदी लागू होईल. यामुळे उमेदवारांना प्रचार करता येणार नाही त्यामुळे आज सायं. ते दि.15/1/26 पर्यंत आचार संहिता भंग केल्याबाबत सातत्याने तक्रारी प्राप्त होतील. सर्व प्राप्त तक्रारींवर भरारी पथकां मार्फत नियमानुसार कार्यवाही करावी. | दि.13/1/26 |
| 4. | निवडणूक निर्णय अधिकारी यांचेकडील आकडेवाडी संकलित करणे. | श्री. राज घरत, सिस्टीम मॅनेजर<br>श्रीम. मनस्वी म्हात्रे, सिस्टीम ॲनालिस्ट | सर्व निवडणूक निर्णय अधिकारी यांचे कार्यालयातून 2 तासाची मतदान आकडेवारी/टक्केवारी संकलित करुन प्रसिध्दी देणे.<br>मतमोजणी फेरीनिहाय मतमोजणीची माहिती निवडणूक निर्णय अधिकारी यांचे स्वाक्षरीनंतर प्रसिध्द करावी. | दि.15-16/1/26 |
| 5. | निवडणूक निर्णय अधिकारी यांचे कार्यालय व मनपा मुख्य कार्यालयातील LED वर माहिती प्रसिध्द करणे बाबत. | श्री. राज घरत, सिस्टीम मॅनेजर<br>श्रीम. मनस्वी म्हात्रे, सिस्टीम ॲनालिस्ट | निवडणूक निर्णय अधिकारी यांचे कार्यालयातून उमेदवारांचे प्रतिनिधी, प्रेस, नागरीकांना माहिती होण्यासाठी माहिती LED वर प्रसिध्द करण्यात येणार आहे. त्याचे प्रात्यक्षिक करुन पहावे.<br>तसेच मुख्य कार्यालयात सर्व निवडणूक निर्णय अधिकारी यांचेकडील माहिती | दि.14/1/26 |

| अ. क्र. | विषय | अंमलबजावणी करणाऱ्या अधिकाऱ्याचे नाव | मा. आयुक्तांचे निर्देश | कालमर्यादा |
|---|---|---|---|---|
| 1 | 2 | 3 | 4 | 5 |
| | | | येणार आहे त्यामुळे ती पत्रकार, वृत्तप्रतिनिधी, समाजमाध्यम यांना उपलब्ध करुन देण्यात येणार आहे. त्याचे प्रात्यक्षिक करुन घ्यावे. | |
| 6. | केबल, वाहीन्या लोंबकळत असले बाबत | श्री. नितिन मुकणे, कार्य. अभि.<br>श्री. राज घरत, सिस्टीम मॅनेजर<br>श्रीम. मनस्वी म्हात्रे, सिस्टीम | यापुर्वीच्या आढावा बैठकीत अस्ताव्यस्थ, लोंबकळणाऱ्या वाहिन्या बंदीस्त करण्याबाबत सुचना देण्यात आल्या होत्या. परंतु त्यांची अंमलबजावणी झाली नाही. आज निवडणूक निरिक्षक यांनी देखिल याबाबत सुचना दिल्या आहेत.<br>तात्काळ सुचनांची अंमलबजावणी करावी. | दि.13/1/26 |
| 7. | वृत्तप्रतिनिधी यांना चहा-नाश्ता व्यवस्था करणे. | श्री. राज घरत, जनसंपर्क अधिकारी<br>श्रीम. चारुशिला खरपडे, विभाग प्रमुख (मबाक) | प्राधिकृत पत्रकारांना मतदान व मतमोजणी दरम्यान चहा-नाश्त्याची व्यवस्था करावी. | दि.15-16/1/26 |
| 8. | प्रचार बंदी बाबत परिपत्रक काढणे. | श्री. सचिन बांगर, उपायुक्त (निवडणूक)<br>श्री. राज घरत, जनसंपर्क अधिकारी | आदर्श आचारसंहिता अंमलबजावणी करीता आज रोजी सायं. 5.30 वा. पासून प्रचार बंदीबाबत सर्व राजकीय पक्ष, उमेदवारांना पत्राव्दारे अवगत करावे तसेच प्रसिध्दी द्यावी. | दि.13/1/26 |
| 9. | मतदान व मतमोजणी साहित्य पुरवठा करणे | श्रीम. मनस्वी म्हात्रे, विभाग प्रमुख (भांडार) | मागणीनुसार मतदान व मतमोजणीसाठी आवश्यक निवडणूक साहित्याचा तातडीने पुरवठा होईल याची खबरदारी घ्यावी. | दि.14-16/1/26 |

उपरोक्त सुचनांची काटेकोर अंमबलजावणी होईल, याची कृपया सर्वांनी दक्षता घ्यावी.

**(राधाबिनोद अ. शर्मा,** भा.प्र.से.)
आयुक्त तथा प्रशासक
मिरा भाईंदर महानगरपालिका

**प्रति,**
**सर्व खाते प्रमुख/विभाग प्रमुख**
मिरा भाईंदर महानगरपालिका